# संचालनालय,
# भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
# महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००५

# ई- निविदा

## ई-निविदा क्र भूसविय/आवेधन/०१/२०१८

**कामाचे स्वरुप - १. खाजगी वाहन दरमाह भाड्याने लावणेबाबत**
**२. खाजगी वाहन आवश्यकतेनुसार तासावर भाड्याने लावणेबाबत**

## ई-निविदा सुचना

ऑनलाईन ई-निविदा भरणेसाठीचा सुरवातीचा दिनांक :- २७/०८/ २०१८  वेळ सकाळी  १०.००
ऑनलाईन ई-निविदा भरणेसाठीचा अंतिम दिनांक :- १८/०९/२०१८  संध्याकाळी  १७.०० वाजेपर्यंत
ऑनलाईन ई-निविदा उघडण्याचा  दिनांक :- १९/०९/२०१८  वेळ सकाळी १२.००

# अभियांत्रिकी शाखा

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ई-निविदा सूचना | ३ |
| २ | निविदेच्या सर्वसाधारण सुचना | ४-५ |
| ३ | निविदेच्या अटी व शर्ती | ५-७ |
| ४ | लिफाफा क्र. २ (दरांचा आर्थिक तपशिल) नमुना क्रमांक - १ | ८ |
| ५ | **Declaration of the Contractor** नमुना क्रमांक - २ | ९ |

संचालनालय

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा

"भूजल भवन" शिवाजीनगर, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००५

Tel : ०२०-२५५१३७१६/२५५३३१७१, **Fax :९१-०२०-२५५३३१०८ e-mail :** cde.gsda@gmail.com

**ई-निविदा सुचना**

संचालनालयातील अधिका-यांना विविध प्रकल्पांतर्गत क्षेत्रीय कामासाठी तसेच वेळोवेळी होणाऱ्या बैठकीस उपस्थित राहणेसाठी खाजगी वाहन भाड्याने लावणेबाबत ई-निविदा सुचना.

**ई-निविदा सुचना क्र. भूसविय/आवेधन/०१/२०१८**

संचालनालय, भूसविय, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयासाठी पुढील एका वर्षाकरिता आवश्यकतेनुसार डिझेलवर चालणारे वातानुकुलीत/बिगर वातानुकुलित प्रवासी वाहने अ.क्र १ नुसार प्रति महिना भाडे तत्वावर लावावयाचे आहे. तसेच अ.क्र २ नुसार आवश्यकते नुसार प्रति दिवस (१२/२४तास) तत्वावर भाड्याने लावणे करिता इच्छुक कंत्राटदार/टुरीस्ट/वाहनमालक यांचेकडून www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर दोन लिफाफे पध्दतीने ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन ई-निविदा भरणेसाठीचा सुरवातीचा दिनांक -२७/०८/ २०१८ वेळ सकाळी १०.०० वाजता.

ऑनलाईन ई-निविदा भरणेसाठीचा अंतिम दिनांक - १८/०९/२०१८ संध्याकाळी १७.०० वाजेपर्यंत

| **अ. क्र.** | **वाहनाचा प्रकार** | **वाहन निश्चिती प्रकार** | **कामाची मुदत** | **बयाणा रक्कम रु** | **निविदेची किंमत रु,** |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| अ | टोयोटा इनोव्हा / महिंद्रा स्कॉर्पिओ | **प्रति महिना भाडे तत्वावर घेणे** | पुरवठा आदेशाच्या दिनांक पासून एक वर्ष | १००००/- | २०००/- |
| ब | स्विफ़्ट डिझायर/ टाटा इंडिगो | | | | |
| **२** | | | | | |
| अ | टोयोटा इनोव्हा क्रिस्टा/ महिंद्रा स्कॉर्पिओ | **कॉल बेसिसवर तात्पुरत्या स्वरुपात खाजगी वाहन भाडयाने घेणे** | एक वर्ष | | |

१. निविदेच्या अटी-शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवलेले आहेत.

२. कॉल बेसिसवर वाहन भाड्याने लावणे करिता प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे, पिंपरी-चिंचवड व बारामती यांची संयुक्त बैठक क्र.४४ दि.१८.०१.२०१७ नुसार निश्चित केलेले २४ तासाचे कमाल दर व सर्व अटी शर्ती लागू राहतील.

**संचालक,**
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य, पुणे

ई-निविदेच्या **सर्वसाधारण सुचना**

१. संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदेव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय प्रणालीद्वारे राबविण्यात येईल.
२. निविदे संदर्भात सविस्तर सुचना www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
३. वरील कामाची निविदा www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
४. निविदेतील अटी व शर्ती इ.बाबी सदर संकेतस्थळावरुन दिनांक २७/०८/ २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक १८/०९/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत डाऊनलोड करता येतील.
५. कामांची निविदा www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७/०८/ २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक १८/०९/२०१८ रोजी संध्याकाळी १७.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अपलोड करता येतील.

**निविदे सोबत खालील बाबी सादर करणे अनिवार्य राहील -**

**अ ) तांत्रिक लिफाफा (लिफाफा क्र. १)**

१. निविदा शुल्क रु. २०००/- भरल्याची यु. टी. आर. ची स्कॅन कॉपी (ना परतावा)
२. बयाणा रक्कम रु. १००००/- भरल्याची टी. आर. (Transaction Receipt) ची स्कॅन कॉपी
३. निविदाकाराकडील प्रवासी वाहनाबाबतचा वाहतुक परवाना (Tourist Permit)
४. पॅनकार्डची प्रत - मालक / कंपनी
५. मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र
६. निविदाधारकाचे सोबत जोडलेले विहित नमुन्यातील घोषणापत्र. (नमुना क्रमांक-२)
७. कंपनी व फर्मचे GST नोंदणी क्रमांकाची प्रत.
८. वैध शॉप अॅक्ट लायसन्सचे कागदपत्राची प्रत.
९. Vehicle fitness certificate issued by RTO

**नोंद :-** प्रथम तांत्रिक लिफाफा उघडला जाईल. निविदा मध्ये नमूद बंधनकारक असलेले कागदपत्राची पुर्तता केली नसल्यास आर्थिक लिफाफा क्र.२ न उघडता निविदा अपात्र ठरविली जाईल.

**ब ) आर्थिक लिफाफा (लिफाफा क्र. २) - नमुना १ नुसार**

१. निविदाकारांनी आपले दर BoQ (Bill of Quantity) मध्ये योग्य त्या जागी भरुन, BoQ लिफाफा क्र. २ मध्ये ऑनलाईन अपलोड करावेत. तसेच वाहनाचा प्रकार नमूद करावा.

**महत्त्वाची नोंद - निविदेचे दर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या इतर कोठेही नमुद करण्यात येवू नये अन्यथा ती निविदा बाद ठरविण्यात येईल.**

**क ) निविदा सादर करणे**

उपरोक्तप्रमाणे नमूद लिफाफा पध्दतीने निविदा ऑनलाईन पध्दतीने अपलोड करुन सादर करावी लागेल. निविदा सादर करण्याचा अंतीम दिनांक व वेळेचे पालन करणे बंधनकारक राहील. निविदाकारांनी विहित वेळेत त्यांची निविदा अपलोड करण्याची दक्षता घ्यावी.

१. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेला लिफाफा क्र. ०१ (तांत्रिक लिफाफा) दिनांक १९/९/२०१८ रोजी सकाळी १२.०० वाजता www.mahatender.gov.in या संकेतस्थळावरुन संचालनालय, भूसर्वियं, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे उघडण्यात येईल.
२. निविदेबाबत मार्गदर्शन सुचना, शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
३. निविदेतील अटी व शर्ती पूर्ण न करणाऱ्या तसेच अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र ठरविल्या जातील.
४. अटी व शर्ती नमुद केलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

५. ई-निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क संचालक, भूसवियं, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राखून ठेवला आहे.
६. संक्षिप्त निविदा सूचना व सविस्तर सूचना निविदेचा भाग राहील.
७. निविदा भरण्यापूर्वी सर्व अटी व शर्ती, तसेच इतर सर्वसाधारण सुचनांचे पूर्ण वाचन करण्यात यावे.
८. वाहन डिझेलवर चालणारे असावे. कार्यालयाने नेमून दिलेल्या जागेत रात्रीच्या वेळी वाहन उभे करावे.

## निविदेच्या अटी व शर्ती

**१.खाजगी वाहन मासिक भाडे तत्वावर लावणे करिता**

१. वाहनाचे दर इंधन, वंगण, देखभाल व दुरुस्ती, वाहनचालकाचा पगार, भत्ता व इतर सर्व करांसह समाविष्ठ राहतील.
२. सदरचे दर प्रत्येक महिन्यातील सुरवातीच्या ३००० कि.मी. साठी लागु राहतील. मात्र महिन्यामध्ये वाहनाची धाव ३००० कि.मी. पेक्षा जास्त झाल्यास वाढीव कि.मी.साठी प्रती कि.मी. प्रमाणे दर दर्शविणेत यावेत. (लिफाफा क्र.२)
३. वाहनांचा वापर शहरी , ग्रामीण भागात तसेच दुर्गम व डोंगराळ भागातही राहील.
४. मंजूर करण्यात आलेल्या निविदाकारा सोबत १ वर्षाचा करारनामा ५००/- च्या बौंड पेपरवर करण्यात येईल. निविदेतील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील. (विहित नमुन्यानुसार)
५. वाहनाची धाव भूजल भवन अथवा संबंधीत अधिकाऱ्याने सुचित केलेल्या ठिकाणापासून सुरु राहील.
६. भाडेतत्वारील वाहन २४ तास कार्यालयाच्या अधिनस्त राहील. सदरचे वाहन संपूर्ण महाराष्ट्रात कोठेही क्षेत्रीय /प्रशासकीय कामासाठी वापरण्यात येईल.
७. वाहन वापरात असतांना वाहन नादुरुस्त झाल्यास, सं बंधित सेवा पुरवठादाराने पुढील प्रवासासाठी त्याच प्रकारातील अन्य पर्यायी वाहन मान्य दराने ४ तासांच्या आत उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल अन्यथा अन्य वाहन वापरल्यामुळे होणारा जास्त खर्च सेवापुरवठादाराकडून वसूल करण्यात येईल. दुरुस्ती/ वाहन चालका अभावी वाहन बंद राहून कार्यालयाची गैरसोय झाल्यास रु.१५००/- प्रतिदिन आकारण्यात येईल व सलग ७ दिवस वाहन उपलब्ध न झाल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
८. वाहनाचा अपघात झाल्यास व न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार/टुरीस्ट / वाहनमालक, इ. यांची राहील.
९. निविदेतील दर मान्य झाल्यास वाहनाचे कराधान पुस्तक (RC/TC), फिटनेस सर्टीफिकीट, वाहनाचा विमा, वाहतुक परवाण्याची कागदपत्रे व वाहनचालकाचा वैध वाहन चालविण्याचा परवाना, अद्ययावत वाहन प्रदुषण चाचणी प्रमाणपत्र, इ. कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर करणे बंधनकारक राहील.
१०. वाहनामध्ये आग सुरक्षा प्रतिबंधकाचे अद्यावत नोंदणी असलेले सिलेंडर ठेवणे बंधनकारक राहील.
११. प्रवासात वेळोवेळी लागणाऱ्या पथकर व पार्किंगची रक्कम वाहनचालकाने प्रथम भरावी लागेल व संबंधीत दौरा करणाऱ्या अधिकाऱ्याच्या मान्यतेने पावती / देयक कार्यालयास सादर केल्यानंतर त्याची अदायगी कंत्राटदार / टुरीस्ट/वाहनमालक, इ. यांना केली जाईल.
१२. वाहन भाडेकरार एक वर्षाकरीता बंधनकारक असेल तथापि करारातील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास करार, दरकरार तात्काळ रद्द करण्याचे अधिकार कार्यालयाने राखून ठेवले आहेत.
१३. शासनाच्या धोरणामध्ये काही बदल झाल्यास अथवा काही अपरिहार्य कारणास्तव आवश्यकता भासल्यास कुठलेही कारण न देता करारनामा संपुष्टात आणण्याचा अधिकार संचालक, भूसवियं, पुणे यांनी राखून ठेवला आहे.
१४. वाहनचालकाला सतत रात्रभर प्रवास करावा लागल्यास व पुन्हा लगेच दुस-या दिवशी सकाळी दौरा असल्यास पर्यायी सक्षम वैध परवानाधारक वाहन चालक उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.
१५. वाहनचालक हा निर्व्यसनी, शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असावा. तसेच वाहनचालकास कोणतेही भत्ते/रक्कम इ. दिले जाणार नाहीत.
१६. वाहनामध्ये कोणत्याही प्रकारचे ज्वलनशील पदार्थ व साहित्य ठेवण्यास सक्त मनाई राहील.

१७. वाहन शासकिय कामासाठी भाडेत्त्वावर (कंत्राटी) वापरावयाचे असल्याने, मोटार वाहन कायदा १९८८ च्या अधिनियमातील तरतुदीनुसार वाहनाचा वाहतुकीचा परवाना असणे आवश्यक आहे व त्यानुसार मोटार वाहन नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

१८. भाडे तत्वावर वाहन पुरविण्याबाबतचा व्यवसाय भागीदारीमध्ये असल्यास निविदा भरणाऱ्याने दुसऱ्या भागीदारी व्यवसायकाराचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

१९. प्रवासादरम्यान वाहनाच्या दुरुस्तीसाठी, वाहनचालकासाठी नास्ता, जेवण तसेच राहण्याच्या व्यवस्थेसाठी वाहनमालकाने योग्य ती आर्थिक तजवीज करावी लागेल.

२०. करारनामा दरम्यानच्या कालावधीत वाहनाचे परवाना, विमा पॉलीसी, वाहनचालकाचा परवाना, इ. मुदत संपण्यापूर्वी त्याचे नुतनीकरण संबंधित कंत्राटदार/ टुरीस्ट/ वाहनमालक, इ. यांनी तात्काळ करुन घेणे बंधनकारक राहील.

२१. मंजुर निविदाधारकास रक्कम १५०००/- ची सुरक्षा अनामत एक वर्ष कालावधीकरीता राष्ट्रीयकृत /शेडयूल बँकेची बँक गॅरंटी स्वरुपात निवेदचा निकाल अधिसूचीत केल्यानंतर ७ दिवसांच्या आत सादर करणे यशस्वी निविदाकारास बंधनकारक राहील. अन्यथा निकालाची अधिसूचना हे कार्यालय रद्द करु शकेल.

२२. वाहन चालवितांना शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण भरपाई शासकिय नियमानुसार देणे कंत्राटदार/टुरीस्ट/वाहनमालक, इ. यांचेवर बंधनकारक राहील.

२३. सादर केलेले देयक निधी उपलब्धतेनुसार अदा केले जातील. प्रलंबीत देयकाच्या रक्कमेवर कोणतेही व्याज देय राहणार नाही. कोणतेही परिस्थितीत अग्रीम दिले जाणार नाही.

२४. प्रतिमहा भाडे तत्व व कॉल बेसिस यांच्या एकूण रक्कमेत जो सर्वात कमी दर सादर करेल त्या L१ पुरवठादारास निविदेस पात्र करण्यात येईल.

२५. वाहन हे ५ वर्षापेक्षा जास्त जुने नसावे. वाहनाची देखभाल व दुरुस्ती विहित वेळेत करणे आवश्यक राहील. तसेच वाहन आतून व बाहेरून स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे बंधनकारक राहील.

२६. BoQ (Bill of Quantity) मधील दर सर्व करांसहीत सर्वसमावेशक नमूद करावेत.

२७. करारनामा कालावधीत वाद निर्माण झाल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र पुणे शहर राहील.

२८. इंधन, वंगण व इतर दरात वाढ झाल्यास वाढीव दराची मागणी करण्यात येऊ नये.

२९. वाहनाचे लॉगबुक विहित नमुन्यात (शासकीय फार्म सर्वसा २५१ म.ई.) ठेवणे आवश्यक आहे. त्यामधील नोंदी विहित वेळेत घेऊन वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेणे आवश्यक राहील.

३०. लॉगबुक मध्ये कोणतेही खाडाखोड नसावी व त्यामधील नोंदीनुसार सादर केलेल्या देयकाची तपासणी करुन देयक अदायगीसाठी सादर केले जाईल.

३१. टीडीएस किंवा अन्य कायदेशीर वजावटी आवश्यक असल्यास त्या करण्यात येतील व त्याचे प्रमाणपत्र संबंधीतांस देण्यात येईल.

३२. वाहनचालक नियमाचे उल्लंघन करत असल्यास किंवा त्याविरुध्द तक्रार असल्यास, वाहनचालक बदलून देण्याची जबाबदारी कंत्राटदार/टुरीस्ट/वाहनमालक, इ. यांची राहील. व आरटीओ मार्फत दंड झाल्यास तो भरण्याची जबाबदारी निविदाकाराची असेल.

३३. वाहनाचा करारनामा केल्यानंतर सदर वाहनाचा वापर अन्यत्र करता येणार नाही. असे केल्यास करारनामा तात्काळ रद्द करण्यात येईल. वाहन दुरुस्तीसाठी होणारी धाव कार्यालयाच्या कामकाजाच्या धावेत समाविष्ट असणार नाही.

३४. वाहनास GPS प्रणाली असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

३५. मोटार वाहन कायदा, १९८८ नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

३६. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा दिनांक १/१२/२०१६ व इतर अनुषंगीक शासन निर्णयामध्ये नमूद मार्गदर्शक सूचना तसेच अटी व शर्ती लागू राहतील.

३७. निविदा पुस्तिके च्या प्रत्येक पानावर निविदा काराने स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील.

३८. करारनामा केल्यानंतर वाहन न पुरवल्यास संबंधित पुरवठादाराचे नाव काळया यादीत समाविष्ट केले जाईल याची नोंद घ्यावी. तसेच करारनामा लिहून देणार यांना करारनामा संपुष्टात आणावाचा असल्यास १ महिन्याची आगाऊ नोटीस देणे बंधनकारक असेल.

३९. गाडीला अपघात झाल्यास गाडी/ वाहनचालक यांना नुकसान झाल्यास निविदा काराला नुकसान भरपाईसाठी या कार्यालयास कोणताही दावा करता येणार नाही.

**कॉल बेसिसवर तात्पुरत्या स्वरुपात खाजगी वाहन भाडयाने लावण्यासाठीच्या अतिरिक्त अटी व शर्ती.**

१) उपरोक्त अ.क्र. १ ते ३९ अटी व शर्ती लागू राहतील.

२) ज्या दिवशी गाडीमध्ये डिझेल भरले जाईल सदरची पावती Paid by me स्वाक्षरीत करुन कार्यालयास सादर करावी त्याशिवाय देयक अदा केले जाणार नाही.

३) वाहन ताब्यात घेतल्यापासून ते परत केल्यापर्यंतचा कालावधी भाडे अदायगीसाठी धरला जाईल.

४) दर तासापर्यंतचा कालावधी अर्धा दिवस धराला जाईल व १२ तासांपेक्षा जास्त कालावधी झाल्यास पुर्ण दिवस म्हणजेच २४ तासाचे भाडे अदा केले जाईल.

५) इंधनाचे दर त्या दिवशी असलेल्या कंपनीच्या दरानुसार देय राहील. इंधन या कार्यालयाद्वारे दिल्यास इं ंधनाची रक्कम वजा करून देयक अदा करण्यात येईल किंवा इंधन आपणाकडून पुरविल्यास प्रादेशिक परिवहन प्राधिकरण,पुणे,पिंपरी-चिंचवड व बारामती यांची सयुक्त बैठक क्रमांक ४४ दि.१८.१.२०१७ नुसार निश्चित केलेले एक लिटर इंधनामध्ये होणारी सरासरी धाव कि.मी चे दरानुसार कार्यालयाकडून अदा करण्यात येईल.

६) वाहनाच्या वापरानुसार महिन्यातील प्रति दिवसाच्या फिरतीच्या वापराचे एकत्रित देयक मुळ तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावे लागेल.

७) प्रति दिवस वाहन वापराचे कि.मी. मर्यादा राहणार नाही.

८) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे, पिंपरी-चिंचवड व बारामती यांची संयुक्त बैठक क्रमांक ४४ दि.१८.१.२०१७ नुसार निश्चित केलेले २४ तासाचे कमाल दर, व त्यामधील सर्व अटी व शर्ती लागु राहतील.

**नमुना क्रमांक - १**

## लिफाफा क्रमांक-२

संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयामधील अधिकाऱ्यांसाठी शहरी तसेच ग्रामीण भागातील क्षेत्रीय दौरे करण्याकरीता खालीलप्रमाणे वाहन भाडयाने लावण्यासाठी वाहनाचे भाडे दर नमुद करावेत. सदर दर हे सर्व खर्चासह समाविष्ट असावेत. उदा. इंधन / वंगण/ देखभाल व दुरुस्ती, वाहनचालकाचा पगार, वाहनाचा कर/ विमा इ. सर्व करासह (रस्त्याचे टोल टॅक्स सोडून) असतील.

| | |
|---|---|
| वाहन मालक/ संस्थाचे नाव | |
| संपुर्ण पत्ता | |
| फोन नं / मोबाईल नं | |

| | **वाहनाचा प्रकार** | **३००० कि.मी.पर्यंतचे प्रती महिना दर रु.** | | **३००० कि.मी. नंतर प्रती कि.मी.दर रु.** | |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **प्रति महिना भाडे तत्वावर घेणे** | अक्षरी | अंकात | अक्षरी | अंकात |
| अ | इनोव्हा / स्कॉर्पिओ | | | | |
| ब | स्विफ़्ट डिझायर/ टाटा इंडिगो | | | | |
| **२** | **२४ तासासाठी खाजगी वाहन भाडेतत्वावर घेणे** | अक्षरी रु. | | अंकात रु. | |
| | टोयोटा इनोव्हा क्रिस्टा / महिंद्रा स्कॉर्पिओ (R.T.O.चे निश्चित दर २४ तासाकरीता) | | | | |

**सही**
**वाहन मालक/ संस्थाचे संपूर्ण नाव**
**शिक्का**

शाखा अभियंता
भू.स.वि.यं.पुणे

उप अभियंता
भू.स.वि.यं.पुणे

वरिष्ठ खोदन अभियंता
भू.स.वि.यं.पुणे

सहा.संचालक (मविवलेसे)
भू.स.वि.यं.पुणे

सहसंचालक (अभियांत्रिकी)
भू.स.वि.यं.पुणे

संचालक
भू.स.वि.यं. पुणे

**नमुना क्रमांक -२**

## DECLARATION OF THE CONTRACTOR

(To be submitted by the Contractor on contractor's letter head in pdf format)

Name of the work : Supply of vehicle on monthly hire basis/ on hourly basis

Tender Notice No : भूसवियं/आवेधन/०१/२०१८

I /we hereby declare that,

1. I/we are interested in the above work
2. I/we have submitted a bid for said work
3. I/we have made my self /our self thoroughly conversant with local condition regarding all service based on which I /we have quoted lower rate for this Tender.
4. I/we have carefully studied All terms and conditions mentioned in the Tender. And understood before submitting this Tender .
5. I/we undertake to give best service
6. I/we accept all the terms and conditions laid down in the Tender document
7. The rate quoted are unconditional. I/we know that the conditional Tender is liable for rejection.
8. I / We agree to pay all taxes as per the guide lines of central / state government.

Signature
Name and seal of contractor

To,
The Director
Groundwater Surveys and Development Agency
Maharashtra state Pune -०५